महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२६/सत्र परीक्षा/सहा/ 940 दिनांक:- 12 JUN 2026

# परिपत्रक

विषय : <u>शासकीय उच्चकला सत्र परीक्षा (शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६)</u>
कला पदविका अभ्यासक्रमांच्या व्दितीय सत्र (Second Semester)
परीक्षेचा निकाल जाहीर करण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या खालील कला पदविका अभ्यासक्रमांच्या व्दितीय सत्र (Second Semester) परीक्षेचा निकाल उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर **शुक्रवार, दिनांक १२.०६.२०२६** रोजी जाहीर करण्यात येत आहे. सदर लिंक मंडळाच्या **www.msbae.ac.in** या संकेतस्थळावर Higher Art Exam या टॅबमध्ये उपलब्ध आहे.

| क्रमांक | अभ्यासक्रम |
|---|---|
| १ | Foundation Certificate of Art & Design |
| २ | Art Teacher Diploma |
| ३ | Diploma In Drawing & Painting |
| ४ | Diploma In Applied Art |
| ५ | Diploma In Sculpture and Modelling |
| ६ | Diploma In Textile Design |
| ७ | Diploma in Interior Decoration |

०२. वरील अभ्यासक्रमाच्या निकालाची प्रत कला परिसंस्थेचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/ प्राचार्य) यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर निकाल संबंधितांना कळविण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच निकालाची प्रत कला परिसंस्थेकडे कायमस्वरुपी जतन करुन ठेवावी. वरील अभ्यासक्रमांच्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना **https://hae.semesterpattern.msbae.in/HAE-student-Result** या लिंकव्दारे आपला बैठक क्रमांक नमूद करून स्वत:चा निकाल स्वतंत्रपणे पाहता येईल. सदर बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करावी.

०३. ज्या कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरले नाहीत अशा विद्यार्थ्यांचा निकाल राखीव (Result held Reserve-RHR) ठेवण्यात आला आहे. निकाल राखीव ठेवण्यात आलेल्या कला परिसंस्थेचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी त्यांच्या कला परिसंस्थेतील संबंधीत अध्यापकांना अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुणासंदर्भातील मुळ कागदपत्रे व (अंतर्गत गुण भरलेले विहीत नमुने) कला परिसंस्थेच्या पत्रासह दिनांक २२.०६.२०२६ ते ३०.०६.२०२६ या कालावधीत मंडळाच्या कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत सुचित करावे. जेणेकरून या प्रकरणी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल. विहीत कालावधीनंतर प्रस्तुत प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, याची सक्त नोंद घ्यावी.

०४. ज्या विद्यार्थ्यांना व्दितीय सत्र परीक्षेतील Semester End Examination **(SEE)** अंतर्गत येणा-या विषयांच्या निकालाबाबत गुण पडताळणी करावयाची असेल, अशा विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज व त्यासाठी लागणारे प्रती विषय रु.१००/- याप्रमाणे पडताळणी शुल्क आपल्या परिसंस्थेकडे जमा करावे. विहीत नमुन्यातील पडताळणी अर्ज उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर Notifications या टॅबमध्ये उपलब्ध आहे.

०५. संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/ प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या गुण पडताळणी अर्जानुसार उच्चकला परीक्षेच्या वरील लिंकवर आपल्या Institute लॉगिन वरुन अशा विद्यार्थ्यांचे गुण पडताळणी अर्ज विहित पडताळणी शुल्कासह दिनांक १५.०६.२०२६ ते २२.०६.२०२६ या कालावधीमध्ये केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. विहित कालावधीमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जावरच पुढील कार्यवाही करण्यात येईल. ऑफलाईन पध्दतीने पडताळणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निवड नस्ती.